I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल
(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. **District (जिल्हा):** वाशिम **P.S. (पोलीस ठाणे):** वाशिम **Year (वर्ष):** 2025

   **FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0719 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 28/08/2025 19:02 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

   1 **Day (दिवस):** शुक्रवार **Date from (दिनांक पासून):** 08/08/2025 **Date To (दिनांक पर्यंत):** 08/08/2025

   **Time Period (कालावधी):** प्रहर ५ **Time From (वेळेपासून):** 12:56 तास **Time To (वेळेपर्यंत):** 13:18 तास

   (b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 28/08/2025 **Time (वेळ):** 18:43 तास

   (c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 036 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 28/08/2025 18:43 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

   1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** पश्चिम, 1 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

   **(b) Address (पत्ता):** अकोला नाका पेट्रोलपंपासमोर, शिवशक्ती ॲटोमोबाईल वाशिम,वाशिम-444505

   **(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

   **District (State) (जिल्हा (राज्य)):** (महाराष्ट्र)

6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):

(a) Name (नाव): श्री.अमित मनोहर भडागे

(b) Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):

(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष): 1991

(d) Nationality (राष्ट्रीयत्व):भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No. (पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख ): Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) Occupation (व्यवसाय):

(i) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मंगरुळपीर, मंगरुळपीर, मंगरूळपीर, वाशिम, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | मंगरुळपीर, मंगरुळपीर, मंगरूळपीर, वाशिम, महाराष्ट्र, भारत |

(j) Phone number (फोन नं.):

Mobile (मोबाइल क्र.): 91-9561678555

7. **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रविण गजानन मुठाळ | | | 1. वाशिम शहर भाग-1,सिव्हील लाईन,33/11 केव्ही सबस्टेशन एमएसई,Town/Village (शहर / गाव): कार्यालय वाशिम,Tehsil (तहसील): वाशिम,Police Station (पोलीस ठाणे): वाशिम,District (जिल्हा): वाशिम,State (राज्य): महाराष्ट्र-444505,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

फिर्याद देताच त्वरीत दाखल

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 4000 रुपये(चार हजार रुपये फक्त | 4,000.00 |

10. **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :** 4,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

यावेळी पोउपनि नाईकवाडे सा.यांनी कलम 7भष्ट्राचार प्रतिबंध अधिनियम 1988 अन्वये गुन्ह्याची

कायमी करवीली.

फिर्याद लाप्रवि वाशिम. दिनांक28/08/2025नाव-श्री.अमित मनोहर भडागे, वय 34 वर्ष, व्यवसाय सोलर कंत्राटदार(Bright Associates)रा.मंगरुळपीर ता. मंगरुळपीर जि.वाशिम

मी वरील ठिकाणी कुटूंबासह राहतो व Bright Associates नावाने सोलर कंत्राटदार म्हणून काम करतो. दिनांक 08/8/2025 रोजी मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग वाशिम कार्यालयात जावून पोलीस उपअधिक्षक, जगदीश परदेशी, लाप्रवि वाशिम यांना एका लाकसेवका विरुध्द लाच मागणीची तकार असले बाबत सांगीतले. त्यानंतर पोलीस उपअधिक्षक, जगदीश परदेशी यांनी वनपरीक्षेत्र अधिकारी, प्रादेशीक विभाग वाशिम येथुन पत्रव्यवहार करुन दोन कर्मचारी (1) निलेश सोळंके (2) वैभव पळसकर असे पंच म्हणुन उपलब्ध करुन घेतले. दोन्ही पंचा समक्ष मी माझी तोंडी तकार सांगुन स्वहस्ताक्षरात लिहुन दिली. ती खालील प्रमाणे.मी समक्ष येऊन तकार देत आहे की, मी वरील ठिकाणी राहत असुन मी सोलर कंत्राटदार (Bright Associates) म्हणुन अंदाजे सन 2016 पासुन काम करतो. श्री. पांडुरंग दौलतराव लहाने रा. सिव्हील लाईन वाशिम ग्राहक क्रमांक326010107434यांच्या घरासाठी 6 किलो वॅट 3 फेज रुफटॉप सोलर साठी मी दि.2.7.2025 रोजी ऑनलाईन अर्ज केला होता. त्यांचे अर्जाची तांत्रीक मंजुरी दि.3.7.2025 रोजी ऑनलाईन प्राप्त झाली होती. त्याप्रमाणे मी सर्व इन्स्टॉलेशन चे काम दि.4.7.2025 रोजी पुर्ण केले होते. इन्स्टॉलेशन चे काम पुर्ण झाल्याने मी मिटर लावण्या करीता AEQC श्री शर्मा साहेब, महावितरण वाशिम यांचे कडे सर्व प्रकारचे काम पुर्ण झाल्याचे पत्र सादर करुन त्यांची या कामासाठीची रिलीज ऑर्डर दि.4.7.2025 रोजी ऑनलाईन प्राप्त केली आहे. ग्राहक श्री. पांडुरंग दौलतराव लहाने रा. सिव्हील लाईन वाशिम यांचे घराचे कनेक्शन सिंगल फेज होते. नविन कनेक्शनची थ्री फेज रिलीज ऑर्डर असल्यामुळे त्यांच्या घराचा सर्वीस केबल हा सिंगल फेज वरुन थ्री फेज करायचा होता. ग्राहक श्री पांडुरंग लहाने यांचे जुने मिटर सिंगल फेजचे असल्यामुळे ते काढुन थ्री फेजचे नविन मिटर लावायचे होते. त्या करीता विद्युत जोडणी ही थ्री फेजची आवश्यक होती. थ्री फेज विद्युत जोडणीकरीता आम्ही सदर एरीयातील लाईनमन प्रविण मुठाळ यांचा मोबाईल क्रमांक 7875321896यां कमांकावर संपर्क केला असता त्यांनी फोनवर बोलण्यास टाळाटाळ करुन प्रत्यक्ष भेटण्याचे सांगीतले. मी लाईनमन प्रविण मुठाळ यांना यापुर्वीही एकदा याच कामाने प्रत्यक्ष भेटलो असता. त्यांनी ग्राहक श्री. पांडुरंग दौलतराव लहाने रा. सिव्हील लाईन वाशिम यांचे घराचे कनेक्शन सिंगल फेज वरुन थ्री फेज विद्युत जोडणी करीता 5000/-रुपयांची मागणी केली होती. तसेच त्यांनी मला सांगीतले की पैसे दिल्याशिवाय मी काम करणार नाही. तुम्ही कोणत्याही अधिकारी यांचे कडे गेले तरी मला विचारल्याशिवाय ते काम होत नाही. सोलर लावण्यापुर्वी तुम्ही माझी परवाणगी घेणे आवश्यक होते. सदर वे कामाची परवाणगी मी एम.एस.ई.बी. इंजीनिअर यांचे कडुन पुर्वीच घेतली. सदर काम करतांना विद्युत जोडणी करीता ट्रान्स्फॉर्मर बंद करणे आवश्यक असते. त्या करीता संबधीत एरीया लाईनमनची आवश्यकता असुन तो त्याच्या शासकीय कर्तव्याचा भाग आहे. लाईनमन प्रविण मुठाळ यांनी मागीतलेले पैसे लाच असल्याने माझी त्यांना पैसे देण्याची इच्छा नाही. लाईनमन प्रविण मुठाळ यांच्याशी माझा कोणताही देण्याघेण्याचा किंवा उसणवारीचा व्यवहार नसून आपसी दुश्मनी नाही. लाईनमन प्रविण मुठाळ यांच्या विरुध्द तकार देण्याकरीता मी व माझे सहकारी श्री.अनिकेत प्रकाश चव्हाण रा.मंगरुळपीर यांचे सह लाप्रवि कार्यालय वाशिम येथे आलो आहे. माझ्या तकारी सोबत मी ग्राहक श्री. पांडुरंग

4/10

दौलतराव लहाने रा. सिकौल लाईन वाशिम यांचे सोलर कनेक्शन संबंधीत सर्व कागदपत्रांची झेराक्स प्रती देत आहे. मी, दिलेल्या तक्रारीवर मी,दोन्ही पंचानी व पो.उप.अधजगदीश परदेशी यांनी वाचुन त्यावर सहया केल्या आहेत. पो.उप.अधि., जगदीश परदेशी यांनी सांगीतले की, तकारदार यांची तकार पडताळणी करणे असल्याने लाईनमन प्रविण मुठाळ यांची प्रत्यक्ष भेट घेवुन पडताळणी कार्यवाही करणे आवश्यक आहे. लाईनमन प्रविण मुठाळ यांचे सोबत माझी कामासंबंधी भेट होणार असल्याने पो.उप.अधि., परदेशी यांनी दोन्ही पंच, स्टाफ व मला पडताळणी कारवाई संबंधी सुचना दिल्या. पो.उप.अधि., जगदीश परदेशी यांच्या सांगण्यावरुन मी लाईनमन मुठाळ यांना कुठे भेटायचे यासाठी फोनलावला. लाईनमन मुठाळ यांनी मला अकोला नाका वाशिम येथील पेट्रोल पंपाचे समोरील शिवशक्ती ऑटोमोबाईल येथे येण्याचे सांगीतले. सदर तक्रारीवरून दि.8/8/2025 रोजी पडताळणी कारवाई करीता मला पोहवा विनोद मारकडे, लाप्रवि वाशिम यांनी व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन माझे शर्टाचे आत बनियानला लावुन दिला. पंच क.1 निलेश सोळंके यांचेसह लाईनमन प्रविण मुठाळ यांची भेट घेवून त्यांची पडताळणी करणेकरीता मी, माझे सहकारी श्री अनिकेत चव्हाण व पंच क.1 निलेश सोळंके असे माझ्या चारचाकी स्कॉर्पीओ वाहनाने अकोला नाका वाशिम येथील पेट्रोल पंपाचे समोरील शिवशक्ती ऑटोमोबाईल येथे गेलो. दुकानामध्ये आत बसलेल्या व्यक्ती कडे मी मानेने इशारा करुन हेच लाईनमन प्रविण मुठाळ असल्याचे पंच क.1 यांना खुनवले. तेव्हा लाईनमन मुठाळ मला म्हटले काय म्हणता त्यावर मी लाईनमन प्रविण मुठाळ यांना म्हटले काहीच नाही ते लहाने साहेबाचं. त्यानंतर लाइनमन प्रविण मुठाळ म्हणाले."आपली सर्व्हस वायराची मजुरी.आणी नेहमी जे देता ते." त्यानंतर मी, लाईनमन मुठाळ यांना माटले "ते मटेरीअल तं देतोच. बाकी मटेरीअल जे लागलं तुम्हालं रॉ मटेरीअल ते मी देतोच."त्यावर लाईनमन मुठाळ म्हणाले "ते मटेरीअल तं देतोच.मटेरीअल ते मटेरीअलचा विषय वेगळा हो.मटेरीअल तं तुम्हालं दयाच लागते" त्यानंतर मी, लाईनमन मुठाळ यांना म्हणालो "हो. त्यावर लाईनमन मुठाळ म्हणाले "आम्हालं सोलरचं दोन हजार रुपये. देतात. त्यानंतर मी, लाईनमन मुठाळ यांना म्हणालो "हो." त्यावर लाईनमन मुठाळ म्हणाले "सिंगल फेजचे एक हजार." त्यानंतर मी, लाईनमन मुठाळ यांना म्हणालो "हो.. त्यावर लाईनमन मुठाळ म्हणाले"थ्री फेजचे दोन हजार. सर्विस वायर टाकायचे हजार रुपये." त्यानंतर मी, लाईनमन मुठाळ यांना महटले "हो. त्यावर लाईनमन मुठाळ म्हणाले "सिंगल फेजचे. थ्री फेजचे त्यानंतर मी, लाईनमन मुठाळ यांना म्हटले "तुम्हालं किती हजार रुपये पाहयजे आता टोटल.?"त्यावर लाईनमन मुठाळ म्हणाले"टोटल मजुरी. मजुरी.सांगायलो तुम्हालं चार हजार रुपये. तुम्हालं जसहे तसं सांगायलो. तुम्हालं काय जास्त सांगीतले नाही. त्यानंतर मी, लाईनमन मुठाळ यांना म्हटले चार हजार रुपये जास्त होते नं हो. त्यावर लाईनमन मुठाळ म्हणाले" तुम्हालं काय सांगतो वायर वढायची मजुरी घेतात. दोन मानसं आणा लागतात मले."त्यानंतर मी, लाईनमन मुठाळ यांना म्हटले,"हो त्यावर लाईनमन मुठाळ म्हणाले "तुमच्यासारखे ते हायत. त्यानंतर मी, लाईनमन मुठाळ यांना म्हटले नाही नाही मानसं मी देतो लागलं तं. तुमच सांगा.काय असल तं.त्यावर लाईनमन मुठाळ म्हणाले मले माहे माणसं घेउन चाला लागतात.मले रात्री बेरात्री काम करा लागते नं. त्यानंतर मी,लाईनमन मुठाळ यांना म्हटले हो त्याहले देठ पण. म्हणजे तुम्हाले किती दयायचे.तसं सांगा.? एकदा क्लिअर असलं की.कस आहे आपले रेगुलर कामं राहयतेनं भाउ. तेव्हढया साठी कशालं.त्यावर लाईनमन मुठाळ म्हणाले म्हणुन म्हणलं तुम्ही चार हजार रुपये देउन

देजा.तुम्हालं बोलायचं काम नाही काही नाही.मी चारंक वाजता येवून ते काम करुन देतो. माणसं आणुन.त्यानंतर मी,लाईनमन मुठाळ यांना महटले"चालते..मग मी तीन चार वाजता भेटु. येवु त्यानंतर मी म्हटले"निलेश चलायचं का मग.चला असे विचारल्यावर पंच क.1यांनी मान हलवुन होकार दिल्यावर आम्ही तेथुन सोबत बाहेर पडुन लाप्रवि कार्यालयात परत आलो.पोहवा विनोद मारकंडे यांनी माझ्याकडुन व्हाईस रेकॉर्डर घेवुन बंद करुन पोलीस उपअधिक्षक,परदेशी यांच्या ताब्यात दिला. माझी अकोला नाका वाशिम येथील पेट्रोल पंपाचे समोरील शिवशक्ती ऑटोमोबाईल येथे लाईनमन प्रविण मुठाळ यांचे सोबत भेट होवून बोलनी झाली. लाईनमन प्रविण मुठाळ यांनी ग्राहक श्री.पांडुरंग दौलतराव लहाने रा.सिव्हील लाईन वाशिम यांचे घराचे कनेक्शन सिंगल फेज वरुन थ्री फेज विद्युत जोडणी करीता 4000/- रुपये लाचेची मागणी केली आहे. याबाबत मी तात्काळ सापळा कारवाई पथक यांना भेटुन सविस्तर हकीकत सांगीतली. लाईनमन मुठाळ यांनी चार वाजता पैसे घेवुन बोलाविले असल्याने पो.उप.अधि.परदेशी यांनी मला, लाईनमन मुठाळ यांना लाच म्हणुन दयावयाची रक्कम 4000/- रूपये हजर करण्यास सांगितले असता मी लाच रक्कमेसाठी 500/-रूपये दराच्या 8 नोटा एकूण 4000/- रूपये हजर केले. सदरची संपुर्ण रक्कम ही माझे व्यवसायातुन मिळालेल्या बचती मधील आहे. मी पंचा समक्ष रक्कम हजर केल्यानंतर लाईनमन मुठाळ यांना लाच म्हणुन दयायचे रक्कमेस पोहवा आसिफ शेख लाप्रवि वाशिम यांनी ॲन्थ्रासिन पावडर लावली. ॲल्ट्राव्हायोलेट लॅम्पचा प्रयोग करुन दाखविला. पो.उप. अधि., परदेशी यांनी सापळा कारवाई संबंधी सर्वांना सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन देवुन पंच क.1 यांचे सह रवाना करण्यापुर्वी पो.उप.अधि., जगदीश परदेशी यांनी मला लाईनमन मुठाळ यांना फोन करुन कोठे भेटायचे आहे अशी विचारण्यास सांगीतले, त्याप्रमाणे मी प्रविण मुठाळ यांना माझे मोबाईल क्रमांक 9561678555यावरुन प्रविण मुठाळ यांचे मोबाईल क्रमांक 7875321896यावर 16.40 वा चे सुमारास फोन लावला व मोबाईलचा स्पिकर सुरु करुन संभाषण केले असता लाईनमन, प्रविण मुठाळ यांनी मला त्यांची मिटींग असुन आपले जे ठरले आहे ते आपण भेटलो त्या गॅरेजवर ठेवुन दयाअसे सांगीतले. त्यावर मी, लाईनमन मुठाळ यांना म्हटले की, आपण प्रत्यक्ष भेटु, त्यावर लाईनमन मुठाळ म्हणाले आज भेटता येणारच नाही. त्यामुळे सापळा कारवाई स्थगीत करुन दि.9.8.2025 रोजी करण्याचे सर्वानुमते ठरले. दि.9.8.2025 रोजी ठरल्याप्रमाणे आम्ही सर्व लाप्रवि कार्यालय येथे सकाळी 10.00 वा. हजर आलो होतो. पो.उप.अधि.परदेशी यांना मी सांगीतले की, मी लाप्रवि कार्यालय येथे येत असतांना लाईनमन मुठाळ यांचा मला फोन आला होता. लाईनमन मुठाळ यांनी मला साईटवर सामान टाकुन दया मी जोडणी करुन घेतो, त्यावर मी लाईनमन मुठाळ यांना तुम्ही कधी भेटणार अशी विचारणा केली असता लाईनमन मुठाळ यांनी ते बाहेर असल्यामुळे नंतर भेटु असे सांगीतले. त्यावर पो.उप.अधि., जगदीश परदेशी यांनी आम्हा सर्वासमक्ष सुचना केल्या की. यानंतरचे सापळा कारवाई दरम्यानचे कॉल हे व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड करण्यात येणार आहेत. त्यानंतर लाईनमन मुठाळ यांची भेट कुठे होवू शकेल यासाठी पो.उप.अधि., परदेशी यांचे सुचने प्रमाणे सापळा कारवाई दरम्यान मी लाईनमन मुठाळ यांना दोन वेळा फोन लावला असता लाईनम मुठाळ यांनी फोन उचलला नाही त्यामुळे सदरची सापळा कारवाई स्थगीत करण्यात आली. दि.20.8.2025 रोजी आम्ही सर्व लाप्रवि कार्यालय येथे हजर झालो होतो. यापुर्वी पो.उप.अधि., परदेशी यांनी दिलेल्या सुचने प्रमाणे वाईस रेकॉर्डर पोहवा विनोद मारकंडे यांनी सुरु केला.कारवाई दरम्यान मी लाईनमन मुठाळ

यांना फोन लावला असता लाईनमन मुठाळ यांनी फोन उचलला. तेव्हा मी फोन स्पिकरवर टाकुन त्यांना बोललो. लाईनमन मुठाळ यांनी ते सुटटीवर असुन सदरचे काम हे कार्यालयात जाउन इतर लाईनमन कडुन करुन घ्यावे असे सांगीतले. त्यामुळे सदरची सापळा कारवाई स्थगीत करण्यात आली. दि.25.8.2025 रोजी आम्ही सर्व लाप्रवि कार्यालय येथे दिलेल्या सुचने प्रमाणे हजर झालो होतो. तेव्हा लाईनमन प्रविण मुठाळ यांच्या सेक्शन ऑफीस एम.एस.ई.बी. कार्यालय नवोदय विदयालय मागे वाशिम येथे जाउन सापळा कारवाई आयोजीत करणार असल्याचे पो.उप.अधि., जगदीश परदेशी यांनी सांगीतले. त्यांनी दिलेल्या सुचने प्रमाणे माझे जवळ सपोउपनि दुर्गादास जाधव यांनी अॅन्थ्रॉसिन पावडर लावलेली लाच रक्कम दिली. तसेच पोहवा. विनोद मारकंडे यांनी व्हाईस रेकॉर्डर माझे शर्टाचे आतील बनियानला लावून दिला.

मला पंच क.०१ यांचे सह सेक्शन ऑफीस एम.एस.ई.बी. कार्यालय नवोदय विदयालय मागे वाशिम येथे रवाना केले. आमचे मागोमाग पो.उप.अधि., जगदीश परेदशी, पंच क.०२ व लाप्रवि स्टाफ सदर कार्यालयाचे जवळ येवुन सापळा लावुन थांबले. मी व पंच क. ०१ असे सेक्शन ऑफीस एम.एस.ई.बी. कार्यालय मध्ये गेलो असता, लाईनमन प्रविण मुठाळ मला तेथे दिसले नाही. मी तेथील एक कर्मचारी यांना लाईनमन मुठाळ यांचे बद्दल विचारले असता त्यांनी मला सांगीतले की, लाईनम मुठाळ हे सुट्टीवर आहेत. लाईनमन मुठाळ कार्यालयात हजर नसल्याने मी लाईनमन मुठाळ यांना कॉल लावुन फोन स्पिकरवर टाकुन बोललो, मुठाळ यांनी ते मुंबईला असुन कार्यालयात जावुन काम करुन घ्या असे सांगीतले. फोनवर बोलणे झाल्यानंतर मी व पंच क. ०१ तेथुन लाच स्विकारल्याचा पुर्वनियोजीत इशारा न करता लाप्रवि कार्यालयात परत निघालो. आमचे मागोमाग पो.उप. अधि., जगदीश परेदशी, पंच क.०२ व लाप्रवि स्टाफ हे कार्यालयात आले. लाप्रवि कार्यालयात पोहचल्यानंतर माझेकडील व्हाईस रेकॉर्डर पोहवा विनोद मारकंडे यांनी बंद केला. पंच क.०१ व मला काय घडले याबाबत विचारणा केली असता वरील प्रमाणे हकीकत सांगीतली. त्यामुळे सापळा कारवाई स्थगीत करण्यात आली.

दि.२८.०८.२०२५ रोजी माझे विनंती वरुन पोउपअधि, परदेशी, दोन्ही पंच आम्ही सर्व लाप्रवि कार्यालय येथे हजर आलो. मी पोउपअधि, परदेशी यांना विनंती केली की, लाईनमन मुठाळ हे सुटटीवर असल्याचे सांगतात परंतु लाईनमन मुठाळ यांना माझे वर संशय आल्याने ते मला भेटण्याचे टाळाटाळ करत आहेत. दि.०८.०८.२०२५ रोजी मी लाईनम मुठाळ यांना आपले व पंचासमक्ष फोन लावला होता व मोबाईलचा स्पिकर सुरु करुन संभाषण केले असता लाईनमन, प्रविण मुठाळ यांनी मला त्यांची मिटींग सुरु असुन मिटींग मध्ये आहे. आपले जे ठरले आहे ते आपण भेटलो त्या गॅरेजवर ठेवुन दया असे सांगीतले. त्यावर मी, लाईनमन मुठाळ यांना म्हटले की, आपण प्रत्यक्ष भेटु, त्यावर लाईनमन मुठाळ म्हणाले ते मिटींग मध्ये आहे आपली भेट होणार नाही. मी त्यांचे सांगणेप्रमाणे लाच रक्कम गॅरेजवर ठेवण्यास नकार देउन प्रत्यक्ष भेटण्यास सांगीतल्याने लाईनमन मुठाळ यांना माझेवर शंका आली असावी, त्यानंतर दि.२०.०८.२०२५ व दि.२५. ०८.२०२५ रोजी सापळा कारवाईमध्ये लाईनमन मुठाळ यांनी फोन वर सांगीतले की, मी मुंबई ला आहे, तुमचे काम कार्यालयात जाउन दुस-या लाईनमन कडुन करुन घ्यावे. असे बोलत मला भेटण्याचे टाळत आहेत. यावरुन लाईनमन मुठाळ यांना माझेवर नक्कीच संशय आला आहे असे मला वाटत आहे.

माझे काम प्रलंबित असल्याने ग्राहक श्री पांडुरंग दौलतराव लहाने हे मला वारंवार फोन करुन काम पुर्ण करण्याबाबत तगादा लावत असल्याने मी दि.२५.०८.२०२५ रोजी सेक्शन एम.एस.ई.बी. कार्यालय, वाशिम येथील संबंधीत अधिकारी नामे श्री डाखोरे यांना भेटलो. त्यांना लाईनमन प्रविण मुठाळ हे माझे काम करण्यास टाळाटाळ करीत असुनआजपोवतो माझे ग्राहक श्री लहाने यांचे काम झाले नसल्याचे सांगीतले. त्यावरुन संबंधीत अधिकारी नामे श्री डाखोरे यांनी ग्राहक श्री. पांडुरंग दौलतराव लहाने रा. सिव्हील लाईन वाशिम यांचे घराचे कनेक्शन सिंगल फेज वरुन थ्री फेज विद्युत जोडणीचे काम दि.२६.०८.२०२५ रोजी दुसऱ्या कर्मचारी यांचे कडुन पुर्ण करुन घेतले आहे. काम पुर्ण झाल्यावर सुध्दा लाईनमन मुठाळ यांनी माझ्याशी कोणताही संपर्क केला नाही. तसेच लाईनमन मुठाळ हे मुंबईला नसुन वाशिम शहरातच असुन ते मला भेटण्यास टाळाटाळ करीत असलेबाबत मला समजुन आले आहे. यावरुन लाईनमन मुठाळ यांना माझेवर संशय आला असल्याने यापुढे ते माझ्याकडून लाच रक्कम स्विकारणार नाही असे माझे ठाम मत झाले आहे. तसेच मला मिळालेल्या माहिती वरुन लाईनमन मुठाळ यांचे संपुर्ण नाव प्रविण गजानन मुठाळ वय ३० वर्षे असे असुन त्याचे पद वरिष्ठ तंत्रज्ञ असल्याचे समजले आहे.

त्यामुळे दि.०८/०८/२०२५ रोजी मी दिलेल्या तकार संबंधाने आपण पुढील कारवाई करावी असे पोउपअधि. जगदीश परदेशी यांना सांगीतले. त्याप्रमाणे पो.उप.अधि., जगदीश परदेशी यांनी माझा सविस्तर जबाब नोंदवून घेतला आहे. प्रविण मुठाळ यांनी ग्राहक श्री पांडुरंग लहाने यांचे जुने मिटर सिंगल फेजचे असल्यामुळे ते काढुन थ्री फेजचे नविन

मिटर लावण्यासाठी ४०००/- रुपये लाच रक्कम मागीतली, म्हणून प्रविण गजानन मुठाळ, वय ३० वर्षे, पद- वरिष्ठ तंत्रज्ञ, कार्यालय- वाशिम शहर भाग-०१, सिव्हील लाईन, ३३/११ के.व्ही. सबस्टेशन एम.एस.ई.बी. कार्यालय वाशिम यांचे विरुध्द माझी कायदेशिर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद पो.हवा विनोद मारकंडे लाप्रवि वाशिम यांनी टंकलिखीत केली असुन मी वाचून पाहली, माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.

सुमक्ष (जगदीश परदेशी) पोलीस उपअधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम.

सही (श्री. अमित मनोहर भडागे) रा. मंगरुळपीर ता. मंगरुळपीर जि. वाशिम



**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): or (किंवा):**

**(2)**

I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

**Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** dnyaneshwar shrirang naikwade

**Rank (हुद्दा):** पोलीस उपनिरीक्षक

**No. (क्र.):** PSI **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला): or (किंवा)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Devendrasinh Bahadursinh Thakur

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):**

**14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**